# वाचा आणि इतरांना सांगा



**वृंदसखी देवी दासी,**इस्कॉन,पुणे.

लक्ष्यवेधी प्रकाशन

प्रचार सेवानिधी रू.५१/-

*हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे।*
*हरे राम हरे राम राम राम हरे हरे।।*

**परं विजयते श्रीकृष्ण संकीर्तनम्।**

© सर्वाधिकार सुरक्षित

लक्ष्यवेधी प्रकाशन

प्रकाशक : विष्णुलोक दास
वैष्णव सेवा केंद्र,१८७, शुक्रवार पेठ, टिळकवाडी,
बेळगांव - ५९० ००६ (कर्नाटक)
संपर्क : ९२४२१७६५८७
E-mail : vishnulok.rns@gmail.com

मुद्रक :

# समर्पण



H$îUH$nm_Vu

**A^`MaUmaqdX ^{º$dXmV ñdm_r à^nmX**

g ñWmnH$ AmMm`

**AmVaam ïr` H$îU^mdZm_V gK**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | महात्यागी | ... | ७ |
| २. | त्यांचे डोके फिरले आहे | ... | ८ |
| ३. | श्वासांचे मोल | ... | ९ |
| ४. | वयाचा हिशोब | ... | १० |
| ५. | आमचे कुटुंब | ... | ११ |
| ६. | सेवकाची इच्छा | ... | १३ |
| ७. | संसार एक धर्मशाळा | ... | १४ |
| ८. | साधू संगाचा प्रकार | ... | १५ |
| ९. | काय करू बाई... | ... | १५ |
| १०. | स्वप्नवत संसार | ... | १७ |
| ११. | समाधान | ... | १९ |
| १२. | संसारचक्र | ... | २० |
| १३. | उतावळेपणा | ... | २२ |
| १४. | कंजूष | ... | २३ |
| १५. | भगतरामाचा भगवंतांवरचा विश्वास | ... | २६ |
| १६. | परिणाम एका दुष्कर्माचा | ... | २६ |
| १७. | संगतीचा प्रभाव | ... | २९ |
| १८. | मला समजायला थोडा वेळ लागला | ... | ३१ |
| १९. | आकाशाच्या दिशेने थुंकणे | ... | ३४ |
| २०. | एक जुनी आठवण | ... | ३५ |
| २१. | Yes, No, Very Good | ... | ३६ |
| २२. | सहनशीलता | ... | ३८ |
| २३. | सर्वात मोठा सन्मान | ... | ३९ |
| २४. | मनापासून लिहिलेले पत्र | ... | ४० |
| २५. | भाव तसा देह | ... | ४१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २६. | घाण्याचा बैल | ... | ४२ |
| २७. | दुर्लक्ष | ... | ४३ |
| २८. | अहंकार | ... | ४४ |
| २९. | माखनचोर नंदकिशोर | ... | ४५ |
| ३०. | शब्दांची शक्ती | ... | ४७ |
| ३१. | मानाचा हव्यास | ... | ४८ |
| ३२. | आसक्ती | ... | ४९ |
| ३३. | हरिनामाची गोडी आवश्यक | ... | ५१ |
| ३४. | जरा लक्ष द्या | ... | ५२ |
| ३५. | राम कृष्ण हरी ! | ... | ५३ |
| ३६. | दोष नको, गुण पहा | ... | ५५ |
| ३७. | भगवान पंडित | ... | ५६ |
| ३८. | धूम्रपानाचे अजब फायदे | ... | ५७ |
| ३९. | जुगार आहे वाईट | ... | ५८ |
| ४०. | आपण खरंच संकटात आहोत | ... | ६० |
| ४१. | अध्यात्माची आवश्यकता | ... | ६१ |
| ४२. | लागा तयारीला | ... | ६३ |
| ४३. | पुनर्जन्म | ... | ६४ |
| ४४. | अर्धवट ज्ञान | ... | ६५ |
| ४५. | कृपाळू भगवंत | ... | ६६ |
| ४६. | हरिनाम संकीर्तन सर्वश्रेष्ठ यज्ञ | ... | ६८ |
| ४७. | स्वार्थ | ... | ७० |
| ४८. | अंतर्बाह्य बदल | ... | ७२ |
| ४९. | खोडकर बाळकृष्ण | ... | ७४ |
| ५०. | करू या प्रकट अज्ञान | ... | ७६ |
| ५१. | नामाचा महिमा | ... | ७७ |

# महात्यागी !



एकदा आश्रमातील साधूंचे आचरण, भोजन आणि भजन यासंबंधी ऐकून एक सज्जन गृहस्थ आश्रम बघायला आले.

भगवद्सेवेत काही धन अर्पण करून त्यांनी साधूंना प्रणाम केला आणि म्हणाले, "हे साधू महाराज, आपल्या मठातील साधूंची मी पुष्कळच स्तुती ऐकली आहे, खरंच तुम्ही लोक मोठे त्यागी आहात."

हे बोलणे ऐकून साधू हसून म्हणाले, "अहो, हे तुम्ही काय सांगता आम्ही त्यागी आहोत म्हणून ? आमच्यापेक्षा मोठे त्यागी तर तुम्ही आहात." साधूंचे हे बोलणे ऐकून ते गृहस्थ म्हणाले, "हे साधू महाराज, तुम्ही माझा उपहास का करत आहात? मी तर संसारात अडकलेला एक गृहस्थ आहे. त्यागी तर तुम्ही आहात."

साधू हसून म्हणाले, "अहो, आम्ही कुठचे त्यागी, आमच्यापेक्षा त्यागी तर तुम्ही आहात."

हे असले बोलणे ऐकून ते गृहस्थ आश्चर्यचकीत झाले आणि म्हणाले, "महाराज, तुम्ही माझी चेष्टा का करता? करं सांगायचे झाले तर मी या संसारात फसलेला असा एक प्राणी आहे की ज्याला या जगातील धंद्यामुळे भगवंताना आठवायची फुरसतही मिळत नाही."

साधू म्हणाले, "ते काहीही असो पण तुम्हीच आहात खरे महात्यागी !"

या गृहस्थाला हा काय प्रकार आहे ते समजेना. त्याने विचार केला, 'आपण तर संसारात अडकलोय् आणि मग महात्यागी कसे काय? त्यागी तर हे साधू आहेत, ज्यांनी जगातील भोगांना लाथ मारली आहे आणि प्रत्येक क्षण ते भगवंतांच्या भजनात मग्न असतात."

ते गृहस्थ बोलले, "हे साधू, मी तर विषयी आहे. परंतु आपण स्वतः त्यागी असताना मला पुन्हा त्यागी का म्हणत आहात?"

यावर साधू म्हणाले, "हे बघा आम्ही लोक तर छोटे त्यागी आहोत. कारण आम्ही ते विषय भोग त्याग केले जे क्षणिक आहेत, नाशवंत आहेत आणि जीवांना

दुःख देणारे आहेत. पण आपण तर सर्वात महान अशा भगवंतांचा आणि सत्संगाचा पूर्ण त्याग केला आहे. म्हणून आपण "महात्यागी" आहात. आम्ही नाही. आम्ही तर तुच्छ सांसारिक गोष्टींचा त्याग केला आहे म्हणून आम्ही छोटे त्यागी आहोत. परंतु आपण महान भगवंतांचाच त्याग केला आहे म्हणून आपण "महात्यागी" आहात."

* * * * *

## त्यांचे डोके फिरले आहे

एका गावात एक भक्त रहात होता. तो साधूसंतांची पुष्कळ सेवा करायचा. परंतु त्याची पत्नी मोठी कर्कश्शा होती. संतांना बघून तिला भयंकर राग यायचा. संतांची होणारी ही सेवा बंद करण्यासाठी ती नित्य नवनवीन त्रास द्यायची.

एक दिवस भक्त कुठेतरी बाहेर गेला होता. त्यावेळी काही साधूसंत त्यांच्या घरी आले. साधू आलेले पाहून या कर्कश्शा बाईने हातात लाटणे नि चिमटा घेतला आणि ती त्या वस्तू कधी या कोपऱ्यात तर कधी त्या कोपऱ्यात उचलून ठेवू लागली.

तिला बराच काळ असे करताना पाहून एका साधूने विचारले, "माताजी, आपण हे लाटणे आणि चिमटा असे सारखे का लपवत आहात?"

दुःखी चेहरा करून ती बाई म्हणाली, "महाराज, माझ्या पतीचे डोके जरा फिरले आहे. जेव्हा घरात कुणी साधू येतात तेव्हा त्यांना ते चिमटा आणि लाटण्याने मारतात. तुमच्यावर दया येऊन मी हे लाटणे आणि चिमटा लपवत आहे. ते आता येतच असतील." हे ऐकून ते साधू घाबरून तेथून पळाले. थोड्या वेळातच भक्त घरी आला. त्याने लांबूनच पाहिले होते की आपल्या घरातून साधू लगबगीने निघून जात आहेत. त्याने पत्नीला विचारले, "तू त्या साधूंना थांबवले का नाहीस?"



पत्नी उसळून म्हणाली, "वा! काय तुमचे ते साधू! ते माझ्याकडे चिमटा आणि लाटणे मागत होते. मी त्यांना का बरे देऊ? पोळ्या करायच्या नाहीत का ?"

भक्त म्हणाला, "अगं, साधू मागत होते तर द्यायचे. आपल्यासाठी मी दुसरे आणले असते. ठीक आहे, चल दे चिमटा आणि लाटणे. ते थोडेच दूर गेले असतील मी त्यांना देऊन येतो."

भक्त चिमटा आणि लाटणे घेऊन साधूंच्या मागे धावला आणि दुरून ओरडू लागला, "महाराज, हे लाटणे, चिमटा घेऊन जा."


साधूंनी बघितले तर खरंच तो चिमटा, लाटणे घेऊन धावत येत आहे. त्याच्या पत्नीने त्याच्यासंबंधी खरंच सांगितले होते तर, असा विचार करून ते सर्व साधू आपले साहित्य तेथेच टाकून वेगाने पळत सुटले.

त्या भक्ताने त्यांना गाठून त्यांचे कसेबसे समाधान केले. जेव्हा त्या भक्ताला आपल्या पत्नीच्या या वागणुकीविषयी कळले. तेव्हा घरी येऊन त्याने त्याच चिमट्याने आणि लाटण्याने पत्नीची पूजा केली. याचा परिणाम म्हणून पत्नी माहेरी निघून गेली आणि तेथे सगळ्यांना सांगू लागली. "मी आता परत जाणार नाही. कारण यांचे डोके फिरले आहे."

भगवद्भक्तांची सेवा न करणाऱ्यांचा स्वभाव असाच असतो.

* * * * *

# श्वासांचे मोल




राजू घराच्या दिशेने भराभर चालला होता. कारण आज त्याला कामावर उशिरापर्यंत काम करावे लागले होते. अर्धे अंतर चालून गेल्यावर त्याला मार्गाच्या कडेला खांद्यावर झोळी घेऊन एक कृष्णभक्त उभे असलेले दिसले. ते अगदी स्वतःच्याच तालात उभे होते. कदाचित ते गाडीची वाट बघत होते.

राजूने पुढे होऊन त्या कृष्णभक्ताला खाली वाकून नमस्कार केला. आशीर्वाद देत भक्ताने राजूला त्याचा परिचय विचारला.

राजू म्हणाला, "मला राजू म्हणतात, तसे माझे नाव राजेंद्र पवार आहे. मी एका खासगी कंपनीत नोकरी करतो. आज कंपनीत थोडा उशीर झाला. बरेच झाले म्हणा नाही तर कदाचित आपले दर्शन झाले नसते."

"अच्छा राजू, कंपनी तुला किती मानधन देते?" भक्ताने विचारले. राजू म्हणाला, "मला १४५० रु. महिन्याला पगार मिळतो."

राजूचे बोलणे ऐकून भक्त शांत होऊन विचार करू लागले, जणू मनातल्या मनात काही गणित करत होते. थोड्या वेळाने ते बोलले, "हं! साडे चौदाशे म्हणजे एका दिवसाचे साधारण ४८ रू. म्हणजे दोन रू. तासाला या गणिताने तू आपले जीवन

विकत आहेस. जरा विचार कर, ज्या दिवशी तुझे आयुष्य संपेल तेव्हा या भावात जीवन मिळेल का? राजू, भ्रमात आहेस. कारण थोड्या पैशाच्या मागे तू आपले श्वास संपवत आहेस. तुझ्या अशा करण्याने कदाचित तुझे पैसे वाढत असतील. पण तुझे श्वास कमी होत आहेत. हे ठीक आहे की एखादे दिवशी आपली लोखंडाची पेटी पैशाने भरेल. पण या चामड्याच्या थैलीतून आपले श्वास संपून जातील. राजू, लक्षात ठेव हे मानव जीवन फक्त पैसे कमवायला मिळालेले नाही, या जीवनात श्वास कमवायला हवेत. अर्थात प्रत्येक श्वासात भगवंताचे स्मरण झाले तर तू मुक्त होशील. मी असे सांगत नाही की तुम्ही काम करू नका. आपले व आपल्या परिवाराचे पालनपोषण करण्यासाठी कमवा पण अधिक लक्ष भगवंतांचे भजन करण्यात असू द्या. ”

कृष्णभक्त हे बोलत असतानाच एक बस समोर येऊन थांबली. राजूला नमस्कार करायला वेळही मिळाला नाही, ते 'हरे कृष्ण' असे बोलून बसमध्ये चढले. काही क्षणातच बस निघून गेली. बस दिसेनाशी होईपर्यंत राजू पहातच राहिला. त्याला पटले की खरंच तो खूपच स्वस्तात आपले श्वास घालवत आहे. राजूने अदृश्य भक्ताला प्रणाम केला आणि तो वेगाने आपल्या घरच्या दिशेने जाऊ लागला.

* * * * *

## वयाचा हिशोब



एकदा एक गुरूदेव आपल्या शिष्याच्या घरी गेले. गुरूंना बघून शिष्याला खूपच आनंद झाला. मोठ्या आनंदाने त्याने गुरू महाराजांचा आदर सत्कार केला.

भोजन करताना गुरूदेवांनी आपल्या शिष्याला विचारले, "तुझे वय काय असेल?" प्रत्यक्षात शिष्य ६०–६५ वर्षाचे दिसत होते पण त्याने उत्तर दिले, "गुरूदेव माझे वय आठ वर्षे आहे."

गुरूंनी विचारले, "तुझ्या धर्मपत्नीचे वय किती आहे?" शिष्य म्हणाला, "सात वर्षे आहे." जेव्हा गुरूंनी त्याच्या मुलाचे वय विचारले, तेव्हा त्याने सांगितले, "तीन वर्षे."

शिष्याचे हे उत्तर ऐकून गुरू–देव आश्चर्यचकीतच झाले. कारण तो शिष्य ६०–६५ वर्षाचा, त्याची धर्मपत्नी ५५ वर्षांची व त्यांचा मुलगा साधारण ३० वर्षाचा वाटत होता.

गुरूंनी पुन्हा शिष्याला त्याचे वय विचारले तर शिष्याने आधीचेच उत्तर दिले आणि पुढे हे ही सांगितले की, "गुरूदेव, आमच्या वयाचे खरे रहस्य असे आहे. पूर्वी आम्ही पशुप्रमाणे केवळ कमवायचो, खायचो आणि झोपायचो अथवा लोहाराच्या भात्याप्रमाणे बहुमूल्य अशा श्वासांना फुकट घालवायचो. परंतु आठ वर्षापूर्वी आपल्याशी भेट झाल्यानंतर आपण माझी अत्यंत पतित अवस्था बघून मला स्वीकारले आणि दिव्य ज्ञानाने माझे डोळे उघडले; ज्यामुळे मी माझे वास्तविक स्वरूप आणि आपला धर्म जाणू शकलो. मी अशाप्रकारे सावरल्यावर एक वर्षानंतर भक्तांच्या कृपेने माझी पत्नी सावरली आणि त्यानंतर चार वर्षानंतर माझा नास्तिक मुलगा पण आपल्या आशीवार्दाने व घरातील बदललेल्या वातावरणाच्या कारणाने योग्य मार्गी लागला. याच कारणामुळे आमचे वय आठ, सात व तीन वर्षे आहे."

* * * * *

# आमचे कुटुंब


एका अरण्यात एक कबूतर रहात होते. एका झाडावर त्याने आपले घरटे बांधले व तो आपली पत्नी मादी कबूतरबरोबर खूप वर्षे त्याच घरट्यात रहात होता. मायामोहाच्या कारणाने ते दोघेही एकमेकांप्रती इतके आसक्त झाले की ते एकत्रच बसायचे, उठायचे, खायचे, खेळायचे, फिरायचे. क्षणभरही ते एक दुसऱ्याशिवाय राहू शकत नव्हते.

कबूतर आपल्या मादीवर इतका आसक्त होता की तिने काही मागितले तर कितीही कष्ट उचलून तिची इच्छा पूर्ण करायचाच आणि ही मादी कबूतर आपल्या कामुक पतीच्या इच्छा पूर्ण करायची.

योग्य वेळी मादी कबूतरने आपल्या पतीबरोबर घरट्यात अंडी घातली. भगवंताच्या अचिंत्य शक्तीने योग्य काळाने ती अंडी फुटून त्यातून कोमलांगी पिल्ले बाहेर आली. आता कबूतर व मादी कबूतर यांचे पूर्ण लक्ष पिल्लांवर केंद्रित झाले. दोघे मोठ्या प्रेमाने आपल्या पिलांचे पालनपोषण करू लागले.

मुले नेहमी आनंदीत असायची. जेव्हा पिले आपल्या मऊ पंखांनी आईवडिलांना स्पर्श करायची, गुटर ऽ गु ची बोबडी भाषा बोलायची, हसत खेळत, गंमत करत, नाचत उड्या मारत आईबाबांकडे यायची तेव्हा कबूतराचे जोडपे आनंदात मग्न होऊन जायचे. ते आपल्या छोट्या बाळांच्या पालन-पोषणात इतके आसक्त राहू लागले की त्यांना संपूर्ण जगताचा अगदी विसर पडला. ते भगवंतांच्या मायेने मोहित होत होते.

एक दिवस ती कबूतरांची जोडी पिलांसाठी चारा आणायला वनात गेली होती. इथे त्यांच्या झाडाजवळ योगायोगाने एक पारधी आला. त्याने ते घरटे पाहिले.



घरट्याच्या आसपास कबूतरांची पिले नाचताना पारध्याला दिसली. त्याने दाणे पसरले आणि जाळे लावलं. दाण्याच्या मोहाने ही भाबडी पिल्ले पुढे गेली आणि जाळ्यात अडकली. काही वेळाने कबूतरांचे जोडपे चारा घेऊन परतले आणि त्यांना आपली गोजीरवाणी पिल्ले जाळ्यात चू चू करताना दिसली.

मादी कबूतरच्या दुःखाला पारावार उरला नाही. ती स्नेहाच्या दोरीने बांधली होती. आपली पिल्ले जाळ्यात अडकलेली बघून तिला स्वतःच्या शरीराची शुद्ध राहिली नाही आणि रडत ओरडत ती पिलांकडे धावली आणि स्वतः जाळ्यात अडकली.

जेव्हा कबूतराने बघितले की आपली प्राणापेक्षा प्रिय अशी पिल्ले जाळ्यात अडकली आहेत आणि प्राणप्रिय अशी पत्नी पण त्याच दशेला पोहोचली आहे, तेव्हा तो अत्यंत दुःखी होऊन विलाप करू लागला. खरंच त्यावेळी त्याची दशा खूपच दयनीय होती.

कबूतर म्हणाला “मी खूपच अभागी आहे. हाय हाय! आज माझा नाश झाला. अजून तर माझी माझ्या संसारसुखाची तृप्ती पण झाली नाही. (कारण भगवंताची मायाच अशी काही आहे की जो जितके जास्त भोग करतो त्याच्या हृदयात तितकी अधिक कामवासना वाढते आणि जो जितके कमी भोग करतो त्याच्या हृदयात कामवासनेची तहान कमी होते.) माझी कितीतरी कामे, किती आशा अपुऱ्या राहिल्या आहेत. माझे कौटुंबिक जीवन तर धुळीला मिळाले. माझे कष्टाने उभारलेले घर आता राहिले नाही. अरेरे! स्त्रीकडून तर धर्मरूप, अर्थरूप आणि कामरूप या त्रिवर्गाची सिद्धता होते. हाय! माझी प्राणप्रिया, मला तिचे इष्टदैवत मानत होती. माझ्या इशाऱ्यावर नाचत होती. ती पूर्णपणे माझ्या अधीन होती. आज तीच मला या सुनसान घरात एकट्याला सोडून सरळ आमच्या निष्पाप बालकांबरोबर काळाच्या मुखात चालली आहे. आता या संसारात माझे काय काम आहे? माझे हे विधुर जीवन, भाजून काढणारे व्यथामय जीवन आहे. आता मी या रिक्त घरात कशासाठी जाऊ?”

अशा प्रकारे विलाप करत, अतिव दुःखाने त्या कबूतराने त्या जाळ्यात उडी

मारली. काही वेळाने तो काळ रूपी क्रूर पारधी आला आणि मोठ्या आनंदाने त्यांना घेऊन गेला.

या जगातही असे बघितले जाते की जर एखाद्याची पत्नी अनुकूल नसेल तर घरात क्लेश, भांडणे असतात. तर कुणाची मुले न ऐकणारी उद्धट असतात आणि जरी आपण असे मानले की एखाद्याला चांगल्या पूर्व कर्मांनुसार अनुकूल चांगली पत्नी आणि मुले मिळालीही व त्याने आपले सुंदर दुर्लभ मनुष्यजीवन केवळ त्याच्या कुटुंबाच्या मायेत, मोहात, सुखदुःखात, विरहात या कबुतराच्या जोडप्याप्रमाणे घालवले तर त्याने कोणते महान कार्य केले ?

दुर्लभ मनुष्यजीवन हे भगवद्प्राप्तीसाठी सुवर्णसंधी आहे असे आपली सर्व शास्त्रे सांगतात. खाणेपिणे, झोपणे, मुले जन्माला घालणे, त्यांचे पालनपोषण करणे. हे तर सर्व योनींमध्ये असतेच, अगदी नरकात-सुद्धा असते. केवळ या सर्व कार्यात आपले अमूल्य जीवन फुकट घालवणे हे काही बुद्धिमत्तेचे काम नाही. हे तर एक प्रकारे आत्महत्त्या करण्याप्रमाणे आहे.

* * * * *

# सेवकाची इच्छा?

हजरत इब्राहिम जेव्हा बादशहा होते तेव्हा त्यांनी एका गुलामाला खरेदी केले. ते उदार स्वभावाचे असल्याकारणाने त्यांनी गुलामाला विचारले, "तुझे नाव काय आहे?" गुलामाने उत्तर दिले, "ज्या नावाने आपण बोलवाल ते."



बादशहा : "तू काय खाणार?"

गुलाम : "जे आपण खायला द्याल ते."

बादशहा : "तुला कपडे कोणते आवडतात?"

गुलाम : "जे आपण घालायला द्याल ते."

बादशहा : "तू काय काम करशील?"

गुलाम : "आपण सांगाल ते."

"अरे शेवटी तुझी इच्छा तरी काय आहे?" बादशहाने हैराण होऊन विचारले."

"मालक! गुलामाला स्वतःची इच्छा नसते?" असे म्हणून गुलाम शांतपणे उभा राहिला.

बादशहा गादीवरून उठले आणि बोलले, "तू तर माझा गुरू आहेस. तुझ्याकडून मी शिकलो की परमात्म्याच्या सेवकाने कसे असायला हवे."

* * * * *

# संसार एक धर्मशाळा

गुजरात येथील अहमदाबाद या ठिकाणी एक साधू पुरुष सतत २५ वर्षे गीतेचे कथन करीत होते. त्यांच्या या सत्संगाच्या कार्यक्रमाला एक भक्त रोज यायचा. त्याने कधीही हा सत्संग चुकवला नाही. दुसरे भक्त कधी कधी सुटी घेत. पण हा भक्त मात्र रोज सर्वात आधी यायचा आणि उशिरा जायचा. 'केशवभाई' हे या भक्ताचे नाव. तो कथा ध्यानपूर्वक ऐकायचा.

एक दिवस या भक्ताचा तरुण मुलगा मरण पावला. त्यामुळे भक्त सत्संगाला जाऊ शकला नाही. सकाळच्या ऐवजी रात्री आठ वाजता भक्त त्या साधूंकडे गेला. आश्रमाचे दार आतून बंद होते. भक्ताने दार ठोठावले आतून आवाज आला. "कोण ?"

भक्त म्हणाला, "मी केशवभाई आहे." साधू आतूनच काही माहीत नसल्याप्रमाणे बोलले, "काय आज सत्संग का चुकवलात? काय झाले? का नाही आलास?"

साधूंना वाटले आता हा भक्त रडायला लागेल. परंतु भक्त शांतपणे बोलला, "महाराज, आज सत्संगाला आलो नाही त्याबद्दल क्षमा मागतो. आमच्या घरी एक पाहुणा आला होता. त्याला निरोप देताना उशीर झाला."

साधूंच्या डोळ्यात पाणी आले. ते चटकन बाहेर आले आणि त्यांनी भक्ताला मिठी मारली व बोलले, "त्याला थांबवण्याचा प्रयत्न का नाही केलास?"

भक्त म्हणाला, "प्रयत्न केला होता. पण थांबला नाही. आम्ही विचार केला, 'पंचवीस वर्षे राहिलेल्या पाहुण्याची पाठवणी जरा व्यवस्थित करावी' म्हणून उशीर झाला."

साधू म्हणाले, "तुम्ही श्वेत वस्त्रातील खरे ज्ञानी आहात. तुमचा तरुण मुलगा गेला. तरी तुमच्या डोळ्यात अश्रू आले नाहीत. मी हे करू शकलो नाही."

भक्त म्हणाला, "स्वामीजी, तुम्हीच तर सांगितले होते ना की संसार ही एक धर्मशाळा आहे. एका हॉटेलप्रमाणे आहे जो येतो त्याला एक ना एक दिवस जावेच लागते. तेथे कुणी कायम रहात नाही."

साधू म्हणाले, "तरुण मुलगा होता. कमवून तुम्हाला खाऊ घालायचा."

भक्त म्हणाला, "प्रत्येक माणसाबरोबर त्याचे प्रारब्ध असते. कोणी कोणाला काही खाऊ घालीत नाही. जितके दिवस संबंध राहिला, आम्ही एकत्र राहिलो, आपली वेळ संपल्यावर पुढे गेलो म्हणून चिंता आणि शोक करण्याचे कारणच नाही."

* * * * *

# साधू संगाचा प्रकार

दुपारच्या तप्त उन्हात प्रवाशांना येताना बघून एक दिवस पाण्याच्या मडक्यावरच्या झाकणाने मडक्याला विचारले, "मित्रा, तीन महिने होऊन गेले, दिवसरात्र मी तुझ्या बरोबर राहतो आणि बघतो की तांब्या, पेला इत्यादी तुझ्याकडे येतात, तू त्यांना भरतोस पण इतक्या दिवसात एकदाही तू मला पाणी पाजले नाहीस. याचे कारण काय?"

झाकणाचे बोलणे ऐकून पाण्याचा माठ गंभीर स्वरात बोलला, "हे बघ झाकणभाऊ, माझ्याकडे जो कुंणी येतो तो रिकामा येतो आणि वाकून येतो. तू तर माझ्यावर बसला आहेस आणि विचारतोस की मला का पाणी पाजत नाहीस म्हणून?"

सांगण्याचे तात्पर्य असे की कपटीपणाचा मळ हृदयात भरून आणि अभिमानाने आपण दीर्घ काळपर्यंत जरी साधू संग केला तरी कृपेचे भांडार असलेल्या साधूबरोबर राहूनसुद्धा आपण झाकणाप्रमाणे रिकामेच राहू.

अभिमान आणि कपट यापासून रहित अशा सरळ हृदयाच्या व दीन स्वभावाच्या व्यक्ती साधू संगात येतील आणि साधूंच्या हृदयात भरलेल्या भगवद्प्रेमाचे आस्वादन करून कृतार्थ होतील.

* * * * *

# काय करू बाई...


सरोज आपल्याच धुंदीत कसल्यातरी विचारात मंदिराच्या पायऱ्या चढत होती. अचानक तिला वाटले की कुणीतरी तिला बोलावत आहे. तिने मागे वळून पाहिले तर तिची सत्संगातली मैत्रिण, कांता तिला बोलावत होती. सरोज थांबली. थोड्या वेळातच कांता तिच्याजवळ पोहोचली तेव्हा तिला 'हरे कृष्ण' असे म्हणून सरोज पायऱ्या चढू लागली.

कांता म्हणाली, "काय ग, तू माझ्यावर नाराज आहेस का?"

"नाही ग, मी कशासाठी तुझ्यावर नाराज होऊ? मी तर स्वतःवरच नाराज आहे." सरोज बोलली.

कांता म्हणाली, "बरेच दिवस झाले तू सत्संगाला नाही येत आहेस. काय कोठे बाहेर गेली होतीस की काय? भक्तसुद्धा तुझ्याबद्दल विचारत होते."

सरोज म्हणाली, "काय सांगू तुला बाई? मागच्या मंगळवारपासून काय माहित काय झाले या शरीराला? ताप उतरतच नाही आणि आमचा नोकर बबलू आहे ना, तो



पण गावाला गेलाय्. तो होता तर आधार असायचा मला. बिचारा! घरातील भांडी, कपडे साफ करायचा, बाजारातून भाजी आणायचा. आता एक तर या तापाने माझे शरीर चालत नाही आणि दुसरे म्हणजे घरातील सगळं काम मलाच करावे लागते."

थोडं थांबून सरोज पुढे म्हणाली, "सकाळी मुलांना न्याहरी देऊन त्यांना तयार करून शाळेत पाठवते. त्यानंतर हे नऊ वाजता जातात, त्यांना खायला घालून पाठवायला लागते. मग घरची सफाई, भांडी, कपडे सगळं मलाच करावे लागते. आता तूच सांग, आजारी माणूस अखेर किती काम करणार? साफसफाई करून जरा कुठे आराम करू म्हणते तर तितक्यात मुलं शाळेतून येतात. त्यानंतर कोण आराम करू देतय्? मुले तर इतकी गोंगाट करतात की बस्. अगदी विचारू नकोस. नंतर त्यांना जेवायला देणे, त्यांचा गृहपाठ करवून घेणे, बस, असे करता करता दिवस कधी संपतो कळतसुद्धा नाही. रात्री पुन्हा तेच. स्वयंपाक बनवणे, जेवायला घालणे, असे करत रात्री दहा वाजता या गाडीला आराम मिळतो. अग तुला काय सांगू? हा मागचा पंधरवडा असा गेला की विचारू नकोस. न जाणे त्या बबलूला पण याच दिवसात जायचे झाले."

सरोजचे बोलणे ऐकून कांता थोडी गंभीर झाली आणि म्हणाली, "हो ग, हे गृहस्थी जीवन असेच त्रासदायक असते. पण यात आपली पण चूक आहेच. आपण लोक सांसारिक कार्यात स्वतःला इतके गुंतवून घेतो की बस! अगदी चितेवर जाईपर्यंत त्यातून बाहेर पडू शकत नाही. बघ, सगळे भक्त त्यागी तर नसतात. गृहस्थांमध्ये पण मोठे मोठे भक्त असतात. त्यांना मुले पण असतात. नातेवाईक असतात. एवढे सगळे असूनही ते मात्र भगवंतांच्या भजनाला जास्त महत्त्व देतात. एक आपण लोक आहोत की दिवसरात्र घरातील अडचणींमध्ये इतके फसतो आणि कधी जरासा रिकामा वेळ मिळाला तर त्यावेळी आपली भजन करायची इच्छा नसते. आता तू तुझेच बघ. बबलू आपल्या गावाला गेला होता. तुला इतका ताप होता, पण तरीही तू तर सर्व कामं केलीस केवळ हरिभजन सोडून..."

सरोज म्हणाली, "ते तर मी पण सांगतेय् कांता; हा गेला पंधरवडा माझा खूप खराब गेला. आधी तर घरी मी थोडी पूजा पाठ करायचे. पण या दिवसात वेळच मिळाला नाही."

दोघींचे बोलणे चालले असताना त्यांच्या लक्षात आले की बोलता बोलता त्या पायऱ्या पार करून मंदिराच्या द्वारापाशी पोहोचल्या आहेत. दोघींनी 'भगवान श्री श्री राधा माधव' ना प्रणाम केला आणि त्या सत्संग भवनात गेल्या. सत्संग समाप्तीनंतर सगळेजण आनंदाने आपापल्या घरी गेले, पण सरोजच्या कानात कांताचे वाक्य गुंजत होते, 'तू आजारी होतीस, तुझा नोकर पण घरी नव्हता, तरी तू सगळी कामं केली केवळ हरिभजन सोडून...'

सरोज विचार करू लागली, ''खरंच या आजारपणाच्या दिवसात मी घरातील कोणते काम केले नाही? घरच्यांना खायला घातले, मुलांचा अभ्यास घेतला, नातेवाईकांचे आगतस्वागत पळत केले, रोज दिवसातून दोन-तीन वेळा अन्न पण खाल्ले. सगळं तर केलं, केवळ हरिभजन सोडून, कदाचित कवि सूरदासनी माझ्यासाठीच हे लिहिले आहे.''

मो सम कौन कुटिल खल कामी।
जिन तन दियो ताहि बिसरायो, ऐसो नमक हरामो ।।
मो सम कौन कुटिल कल कामी।

* * * * *

# स्वप्नवत संसार

राजाची झोपमोड होऊ नये म्हणून सगळे शांत आहेत. आता थोड्या वेळापूर्वीच तर राजेसाहेबांचा डोळा लागला. बस्; डोळा लागल्या-बरोबर ते स्वप्नराज्यात निघून गेले आणि पाहू लागले की आता त्यांचा परिवार बराच मोठा झालाय. आधी घरात ते तिघंच होते आता आठ आहेत. त्यांनी आपल्या राज्याचा बराच विस्तार केला आहे.

परंतु लोभ कधीही लाल बावटा दाखवत नसतो. बस्, राजाला काय वाटले कुणास ठाऊक? आणि राजाने आपल्या चार राजकुमारांना आपल्या शेजारच्या राज्यावर आक्रमण करायला पाठवले. चौथ्या दिवशी मंत्र्याने येऊन बातमी दिली, ''महाराज, घनघोर युद्ध सुरू आहे. चारही राजकुमार वीरतेने लढत आहेत. परंतु शेजारील राज्याच्या सेनेपुढे आपली सेना कमी पडते आहे असे वाटते.''

तेव्हा राजाने आपल्या दोन राजकुमारांना बोलावून एका मोठ्या सेनेबरोबर आपल्या चार भावांच्या मदतीला पाठवले. युद्धाच्या सातव्या दिवशी मंत्री एक रथ घेऊन आला. मंत्र्याला आलेला बघून आनंदाने राजाने मंत्र्याला विचारले, ''काय मंत्री, शेजारील राज्यावर माझ्या राजकुमारांनी कब्जा केला ना?''



मंत्र्याने मान खाली घातली...

"मंत्री! सगळं कुशल तर आहे ना? माझ्या काळजाचे तुकडे माझे राजकुमार सगळे ठीक आहेत ना?" राजाने मंत्र्याला हलवून विचारले त्यावेळी शिपायांनी एका पाठोपाठ एक वीरगती प्राप्त झालेल्या सहा राजकुमारांना राजासमोर जमिनीवर ठेवले आणि ते स्वतः मान झुकवून उभे राहिले.

सुंदर, राजबिंड्या, तरुण राजकुमारांच्या प्रेतांकडे बघून राजाच्या तोंडातून किंकाळी बाहेर पडली आणि तो घाबरून उठून बसला.

त्याचवेळी राजाने ऐकले की खोलीबाहेर बायकांचा मोठ्याने रडण्याचा आवाज येत आहे, जणू कुणी मेले आहे. राजाने डोळे चोळले. 'अजून आपण स्वप्नतर बघत नाही ना?' परंतु त्याचे ऐकणे बरोबर होते. राजा उठला आणि आपल्या राजकुमारांच्या खोलीच्या दिशेने गेला.

तेथे जाऊन बघतो तर काय? त्याची राणी आणि काही दासी राजकुमाराच्या मृत शरीराभोवती बसून मोठ्याने रडत आहेत. राजाचे पाय लटपटू लागले, तो निर्जीवपणे जवळच्या दरवाजाच्या आधाराला टेकला आणि मेंदूवर जोर देऊन विचार करू लागला.

'काय मी रडायला हवे? जेव्हा माझे डोळे बंद होते त्यावेळी माझे सुंदर सहा राजकुमार एकावेळी मृत्यू पावले आणि आता जेव्हा डोळे उघडले तेव्हा बघतो तर काय, माझा एकुलता एक राजकुमार मृत्यू पावला आहे. मी रडू तर कुणासाठी रडू? त्या सहा राजकुमारांसाठी की या एका राजकुमारासाठी – दोन्ही तर अनित्य आहेत.'

* * * * *

# समाधान



गावात चोहो बाजूला हिरवळ पसरलेली होती आणि त्यावर संध्याकाळच्या सूर्याचे लालसर सोनेरी किरण पसरवली होती. वा! किती सुंदर दृष्य होते ते! पण का कुणास ठाऊक, संजुला हे सगळं चांगलं वाटत नव्हतं. आपल्याच मित्राशी वादविवाद केल्याने त्याचे मन थोडे अशांत झाले होते.

संजुला कळतच नव्हते की आपला मित्र रोहित याला कसे समजवावं? खरं तर भगवंत असतात, त्यांचे भजन करणे हेच आपले एकमात्र कर्तव्य आहे. त्यांच्याच इच्छेने तो लयास जातो. भगवंतांशी उन्मुख झाल्याकारणाने आपण लोक आनंदमय भगवद्धाम वैकुंठातून भटकून तेथे दुःखाच्या सागरात डुबक्या घेत आहोत. सर्व संत आणि सर्व ग्रंथ याच गोष्टी विविध प्रकारे समजावत आहेत.

परंतु रोहितच्या मते मात्र हे सर्व ग्रंथ बकवास आहेत. ब्राह्मण खाण्या-पिण्यासाठी असे धंदे करतात, प्रकृती या जगाला चालवते.

'अरे पण या प्रकृतीला कोण चालवतो?' असे रोहितला विचारले तर म्हणतो, 'मी नाही मानत भगवंताला'.

'आता कसे समजवावे रोहितला? कुणी व्यक्ती शास्त्राला मानणारी असली तर तिला शास्त्राचे प्रमाण देऊन समजावले जाऊ शकते. चला, आपण समजूया की शास्त्र मान्य करण्याइतके त्याचे भाग्य नाही पण युक्ती तर मानायला हवी ना! मी मानणार नाही, मी मानणार नाही असे म्हणून कसे चालेल?'

आपल्यातच मग्न असलेला संजू अचानक एका भयंकर अशा कर्कश आवाजाने घाबरला. तो दचकला, त्याच्या अंगावर काटा आला. डोळ्यात भीती दाटली. त्याने बघितले की त्याच्या सभोवताली अंधार पसरला आहे आणि बाजूच्याच एका मोठ्या झाडावरची काही घुबडे कशावर तरी तुटून पडली आहेत. संजूचे सगळे लक्ष त्या घुबडांकडे लागले. तो विचार करू लागला.

'हे कसले पक्षी आहेत, जेव्हा सगळे झोपतात त्यावेळी हे जागे होतात. ते झोपलेले असताना इतका गडबड करणारा हा संसार पण त्यांना शांतच वाटत असेल. विधात्याने कसले कसले प्राणी बनवले! जेव्हा सूर्य उगवण्याच्या विचारात असतो, जेव्हा सगळे पक्षी किलबिलाट करू लागतात, त्याआधीच हे घुबड एखाद्या एकांत ठिकाणी जाऊन गाढ झोपत असेल आणि जेव्हा सूर्यास्त होतो, सर्वत्र अंधाराचे साम्राज्य पसरले की त्यावेळी ही घुबडे जागी होऊन पक्ष्यांवर हल्ला करायला सुरुवात करतात.'

'अरे, जर सगळे पक्षी या घुबडांना दिवसाच्या सुंदर प्रकाशाबद्दल, सांगतील आणि सूर्याचा महिमा सांगतील तर ही घुबडे मानतील का? नाही, ते कधीच मानणार नाहीत.' ते म्हणतील, "जी गोष्ट आम्ही बघत नाही त्या गोष्टीला आम्ही कधीच मानणार नाही. ही सगळी मनाने बनवलेली काल्पनिक गोष्ट आहे, सूर्य एक कल्पना आहे."

संजू लक्ष देऊन त्या घुबडांच्या झटापटी बघू लागला. त्याला का कुणास ठाऊक असे वाटले की झाडावर बसलेल्या सर्व घुबडांमध्ये त्याचा मित्र रोहित पण बसला आहे जो मोठ्या थाटात सांगत आहे की "कोणी भगवान वगैरे नाही. हे सगळं काल्पनिक असते. ब्राह्मणांनी पोटापाण्यासाठी काढलेले हे धंदे आहेत."

संजू पुढे विचार करू लागला, 'हो भक्त, भगवंत सगळं काही करू शकतता; ते कावळ्याला हंस बनवू शकतात; तर रोहितला भगवद्भक्त का नाही बनवू शकणार? त्याचे संस्कार का नाही बदलू शकणार?'

आता संजूचे मन अगदी शांत झाले. अंधाराला कापत तो आपल्या घराच्या दिशेने चालला होता. रोहितच्या ज्या बोलण्याने तो बेचैन झाला होता, ते बोलणे त्याला चेष्टेप्रमाणे वाटू लागले. आता मात्र त्याच्या चिंतेचे पूर्ण समाधान झाल!

* * * * *

# संसारचक्र

कैलास खूपच वाईट प्रकारे संसाराच्या विषयांमध्ये गुंतून पडला होता. कैलासचा एक मित्र होता, जो घरदार सोडून भजनमार्गाला लागला होता. कैलासनेसुद्धा या संसाराच्या गुंत्यातून बाहेर पडून आता भक्तीमार्गाला लागावे, अशी मित्राची इच्छा होती.

एक दिवस हा मित्र कैलासकडे आला व म्हणाला, "सोडून दे हा संसार आणि माझ्याबरोबर चल. आपण दोघे भजन करूया. या संसारात केवळ दुःखच दुःख आहे." कैलासने आपल्या जबाबदाऱ्यांबद्दल सांगितले आणि मित्राला थोडा काळ थांबायला सांगितले.

मित्र निघून गेला. बऱ्याच वर्षांनी कैलासची आठवण झाल्याने तो त्याच्या

गरी गेला. तिथे गेल्यावर त्याला समजले की काही वर्षांपूर्वीच कैलास मृत्यू पावला. कैलासच्या निधनाबद्दल ऐकून मित्र दुःखी झाला. मित्राने आपल्या योगबळाने जाणले की कैलास आता याच घरात गाय बनून दूध देऊन सगळ्या कुटुंबाची सेवा करत आहे.

मित्राने कैलासला "आता चल" असे सांगितले कैलास म्हणाला, "अरे, यांना चांगले दूध मिळत नाही. आणखी काही काळ दूध देतो आणि नंतर तुझ्याबरोबर येईन." मित्र निघून गेला.

पुन्हा काही काळानंतर मित्र कैलासच्या घरी आला. पण त्यावेळी त्याला कळले की कैलासने गाईचे शरीर सोडले आहे आणि तो कुत्रा बनून आपल्या घराची राखण करत आहे.

मित्राने आपल्या योगबळाने एकांतात कैलासशी बोलायला सुरुवात केली. त्याला त्याची दुर्दशा सांगितली आणि जबरदस्तीने बरोबर चलायला सांगितले.आपल्या झालेल्या पतनाबद्दल कैलासला थोडी लाज वाटली पण आपला नाईलाज प्रकट करत कैलास म्हणाला, "काय करू? येथे बरेच चोर आहेत आणि जर मी नसेन तर ते सगळं सामान उचलून घेऊन जातील. थोडे आणखी थांब नंतर येईन."

मित्र निघून गेला आणि पुन्हा जेव्हा त्याला कैलासची आठवण झाली तेव्हा कैलासप्रती दया वाटून मित्र कैलासकडे आला. तेथे कळले की 'कुत्रा मरण पावला आहे. मित्राला कळले की कैलास आता नाग बनून आपल्या वडिलोपार्जित धनाची राखण करीत आहे; जेणे करून ते धन कुणी घेऊन जाणार नाही.'


कैलासचे कुटुंब आता गरीब झाले होते. त्यावेळी कैलासच्या या साधुमित्राने कैलासच्या गरीब सुनांना व मुलींना सांगितले, "मी तुम्हाला धन देऊ शकतो पण तुम्हाला एक गोष्ट कबूल करावी लागेल आणि ती म्हणजे त्या धनाची रखवाली करणाऱ्या नागाला तुम्ही मारणार नाही."

ते म्हणाले, "ठीक आहे." खड्डा खणल्यावर त्यांनी बघितले तर नाग फणा वर करून फुतकरत होता, पण तो कुणाला चावत नव्हता. कारण तो आपल्या मुलांना ओळखत होता. धन बघितल्यावर साधूने नको नको म्हटले तरी सगळयांनी मिळून नागाला काठ्यांनी मारून ठार केले.नाग (कैलास) ज्यांना माझे माझे म्हणत होता, त्यांनीच शेवटी त्याला ठार मारले.



* * * * *

# उतावळेपणा



दीपक आज अधिकच प्रसन्न दिसत होता. आज पहाटेच तो एका कृष्णभक्ता समवेत भ्रमण करायला निघाला होता; असा त्याच्या जीवनातील हा पहिलाच दिवस होता. जरी ते कृष्णभक्त दीपकशी काही चर्चा करत नव्हते, तरी दीपकचे हृदय मात्र आनंदाने उड्या मारत होते.

त्याला वाटले, 'तसे भजन, साधना तर आपणही करतोच, पण ती गोष्ट अजून त्याच्या जीवनात आली नव्हती आणि ती म्हणजे भगवंताच्या दर्शनासाठी असलेला उतावळेपणा, आर्त इच्छा!'

'कसा असेल हा उतावळेपणा? कशी असते ती आर्त इच्छा? त्यात स्वत:लाच विसरून जाऊन केवळ भगवंताना भेटण्याची आत्यंतिक आस्था वाटू लागते, कसे असेल ते जीवन ज्यात जीव आपलं सर्वस्व विसरून सर्वव्यापक भगवंताशी प्रेम करू लागते.'

दीपकने विचारले, "हे गुरूदेव, भगवंतांच्या दर्शनासाठी कशा प्रकारची आर्तता हवी?"

'हरे कृष्ण' महामंत्राचा माळेवर जप करत असलेल्या भक्ताने दीपकचे बोलणे ऐकले. पण काही उत्तर दिले नाही. केवळ इतकेच सांगितले "आधी स्नान वगैरे करून या मग यावर विचार करू या."

दीपक चूप बसला आणि साधूनी आपले लक्ष पुन्हा हरिनामावर केंद्रित केले. दोघेही फिरत फिरत एका तलावाच्या किनाऱ्याजवळ पोहोचले. तलावात स्नान करताना जेव्हा दीपकने पाण्यात डुबकी मारली तेव्हा भक्ताने आपल्या बलवान हाताने दीपकची मान पकडून त्याला पाण्यात बुडवले.

दीपक घाबरला, त्याला वाटले जणू आज त्याच्या जीवनाचा अंतिम दिवस आहे, त्यावेळी साधूने त्याची मान सोडली.

कसाबसा दीपक पाण्याबाहेर पडला आणि घाबरून, थोडा रागावून साशंक नजरेने रोखून पाहू लागला आणि बोलला, "कमाल आहे तुमची, तुम्ही तर मला आज मारूनच टाकले होते."

भक्त म्हणाला, "अरे नाही, नाही, मी तर तुझ्या प्रश्नाचे उत्तर देत होतो."

दीपक म्हणाला, "काय उत्तर देत होता? अजून काही वेळ झाला असता तर मी मेलोच असतो."

भक्त म्हणाला, "तूच विचारले होतेस ना की भगवंतांच्या दर्शनासाठी कशा प्रकारची आर्तता असायला हवी. बघ जेव्हा मी तुझे डोके पाण्यात बुडवले तेव्हा आपले जीवन मिळवायला तू जितका उताविळ झाला होतास ना, तितकाच उतावळेपणा भगवद्प्राप्तीसाठी हवा."

* * * * *

# कंजूष

एका गावात एक सधन ब्राह्मण रहात होता. गावात तो सर्वांना नेहमी उत्साहाने मदत करीत असे. गावातील मुलांना तो शास्त्रातील, गीतेतील श्लोक शिकवत असे. मुलांना शिकवण्यासाठी तो कधी पैसे घेत नसे. पूजाअर्चा करून त्याचे घर व्यवस्थित चाले. या ब्राह्मणाचा एक मुलगा होता. मुलगा वयात आल्यावर त्याचे एका मुलीशी लग्न लावले. हा मुलगा आपल्या वडिलांसारखा उदार नव्हता. तो अत्यंत कंजूष स्वभावाचा होता. आपल्या बायकोने जर भाकरी वाढली तर तो त्या भाकरीवर कणभरही तूप घेत नसे, भाकरी केवळ तुपाच्या डब्यावर धरून तो खात असे. तर असा हा सज्जन ब्राह्मणाचा कवडीचुंबक मुलगा आपल्या घरची परिस्थिती चांगली असूनही कुठल्याही कारणासाठी पैसे काढायला तयार नसे.

काही वर्षांनी वृद्धापकाळाने हा सज्जन ब्राह्मण आजारी पडला आणि मृत्यू पावला. या कंजूष मुलाच्या डोक्यात अंतक्रियेसाठीच्या खर्चाची आकडेमोड सुरू झाली. तो मनातच म्हणाला, 'छे! इतका खर्च कशाला करायचा? आपण सगळं स्वस्तातच करूया.' असा विचार करून त्या मुलाने आपल्या मृत पित्याला पाठीवर उचलले व तो चालत निघाला. मनातच म्हणत होता, 'हे प्रेत आपण नदीत टाकू या, आपले पैसे वाचतील.' असा विचार करत तो पुढे चालत राहिला.

हे अजब दृष्य आपल्या धामातून भगवान श्रीविष्णूंनी पाहिले. ते सर्वांच्या हृदयात परमात्म्याच्या रूपात रहातात. म्हणून त्यांना या कंजूष मुलाच्या मनातले विचार कळले आणि त्यांनी लगेच एका ब्राह्मणाचे रूप घेतले. आपल्या मृत बाबांना पाठीवर घेऊन जाणाऱ्या मुलासमोर ते चालत आले आणि बोलले, "अहो, तुम्ही हे असे कुठे चाललात?" मुलगा म्हणाला, "माझे वडील मृत्यू पावले. आता मी त्यांना नदीत सोडायला चाललो आहे." श्रीविष्णू म्हणाले, "अरे, पण शास्त्रात तर लिहिले आहे की अंत्येष्टी संस्कार करायला हवेत, तू का करत नाहीस?" मुलगा म्हणाला, "माझ्याजवळ खर्च करायला पैसे नाहीत."

श्रीविष्णू म्हणाले, “बरं. तुझ्याने होत नाही ना? मी करतो सर्व संस्कार. तू मला फक्त १०० रु. दे.” मुलगा म्हणाला, “इतके? मिळणार नाहीत.” विष्णू म्हणाले, “बरं ५० रु. देशील?” मुलगा बोलला, “अहो काही तरीच काय? इतके पैसे?” विष्णू म्हणाले, “ठीक आहे, १० रु. तरी देशील ना?” मुलगा बोलला, “नाही.” शेवटी घासघीस करत त्या कंजूष मुलाने ब्राह्मणाच्या रूपात असलेल्या श्रीविष्णूंना सव्वा रुपया देईन असे सांगून पटवले.

श्रीविष्णूंनी त्या म्हाताऱ्या ब्राह्मणाचे सर्व अंत्यसंस्कार पार पाडले. मुलगा बाजूला उभा राहून सर्व बघत होता. सगळं आटपल्यावर श्रीविष्णूंनी त्या कंजूष मुलाकडे सव्वा रुपया मागितला. त्याला सव्वा रुपया द्यायला अगदी जीवावर आले होते. तो म्हणाला, “आता माझ्याकडे पैसे नाहीत. तू उद्या सकाळी माझ्या घरी ये. मी देईन.” “ठीक आहे.” असे म्हणून श्रीविष्णू निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी हा कंजूष मुलगा घरात बसून सव्वा रुपया कसा वाचवायचा या विचारात मग्न होता. इतक्यात घराच्या खिडकीतून दूरवरून तो काल भेटलेला ब्राह्मण (श्रीविष्णू भगवान) येताना त्याला दिसला. कसंही करून हा सव्वा रुपया वाचवायचाच असं म्हणून त्याने आपल्या बायकोला सांगितले, “हे बघ, आता एक ब्राह्मण येईल आणि सव्वा रुपया मागेल. मी इथे खाली जमिनीवर मेल्यासारखा पडून राहतो. तू त्याला सांग की आत्ताच माझा पती मेला. मी तुला कसे पैसे देऊ?” असं म्हणून या कंजूष मुलाने चटकन् बायकोचे कुंकू पुसले, मंगळसूत्र काढून बाजूला ठेवले आणि तिच्या बांगड्या फोडल्या आणि तो चटकन् जमिनीवर मेल्यासारखा पडून राहिला.

बायकोने पतीच्या आज्ञेनुसार रडायला सुरूवात केली. ब्राह्मण बाहेरून हाका मारू लागला तसे तिने दार उघडून त्याला आत घेतले. ब्राह्मण म्हणाला, “मी माझा सव्वा रुपया घ्यायला आलोय्.” बायको म्हणाली, “अहो, माझ्या पतीचे आताच निधन झाले. आता पैसे कोठून मिळणार?” श्रीविष्णू मनातच हसले, त्यांना त्या मुलाची लबाडी लक्षात आली. कंजूषाला जमिनीवर पसरलेले पाहून विष्णू म्हणाले, ‘हो खरंच, आता तुम्ही एकट्याने याचे अंत्यसंस्कार कसे कराल? मी असं करतो, जाताजाता याचेही अंत्यसंस्कार करतो.” श्रीविष्णूंनी चटकन् त्या मुलाला पाठीवर घेतले व ते चालू लागले. मुलाने हूँ की चूँ पण केले नाही. स्मशानभूमीत श्रीविष्णूंनी एके ठिकाणी लाकडे रचली व त्यावर त्या मुलाला ठेवले. श्रीविष्णू मंत्र म्हणू लागले. हा मुलगा चितेवर स्थिर झोपून राहिला. श्रीविष्णूनी एक लाकूड पेटवले व ते आता चितेला अग्नी लावायला पुढे येऊ लागले. मनातून श्रीविष्णू चकीत झाले होते, म्हणत होते, ‘केवळ सव्वा रुपया वाचवायला माणूस काय काय करू शकतो?’ या विचारात ते आग


लावणार इतक्यात हा कंजूष मुलगा अंदाज घेत होताच. श्रीविष्णू जवळ आल्याबरोबर तो टुणकन् उडी मारून चितेवरून खाली आला.

हे पाहून श्रीविष्णू हसू लागले. अगदी पोट धरून हसू लागले. श्रीविष्णू हसता हसता आपल्या खऱ्या रूपात प्रकट झाले व म्हणाले, “हे बघ मुला, आज मी खूप दिवसांनी इतका हसलो. तू मला खूप हसवलेस. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. माग, तुला काय हवे ते मी देईन.”

तो कंजूष मुलगा म्हणाला, “नक्की द्याल ना? की मग नाही म्हणाल?” श्रीविष्णू बोलले, “अगदी अवश्य देईन.” तरी आणखी दोनदा विचारून त्या कंजूष मुलाने खात्री करून घेतली की आपण मागू ते श्रीविष्णू देतीलच. मग थोडं थांबून विचार करून तो कंजूष म्हणाला, “तुम्ही माझ्याकडून तो सव्वा रुपया मागू नका. बस् मला आणखी काही नको.”

माणसाची आसक्ती किती असू शकते ती आपण या गोष्टीवरून समजू शकतो. समोर साक्षात भगवंत आले तरी मनुष्य मायेच्या पडद्यामुळे त्यांचे श्रेष्ठत्व जाणू शकत नाही, तो स्वत:मध्येच गुंतून रहातो आणि जीवन सफळ करण्यासाठी तो प्रयत्न करत नाही.

* * * * *



# भगतरामाचा भगवंतांवरचा विश्वास



एका गावात मोठा दुष्काळ पडला होता. गावातील साधूने सांगितले की सगळ्यांनी मिळून भगवंतांच्या मंदिरात जाऊन प्रार्थना करावी.

न ऐकून कुणाला सांगायचे असं म्हणून गावातील प्रत्येकजण दुसऱ्या दिवशी सकाळी मंदिरात जाण्यासाठी घराबाहेर पडला. या लोकांमध्ये केवळ विज्ञानावर विश्वास ठेवणारे आणि भगवंतांचे भजन करणाऱ्या भक्तांना हसणारे, त्यांची चेष्टा करणारे असे सर्व प्रकारचे लोक एकत्र होते.

सगळ्यात मोठे आश्चर्य असे होते की गावातील 'भगतराम' नावाचे गृहस्थ ३-४ छत्र्या घेऊन चालले होते. प्रत्येकाची त्या छत्र्यांवर नजर पडायची आणि त्यांच्या मनात प्रश्न पडायचा की या दुष्काळाच्या काळात सकाळीच हा माणूस छत्र्या घेऊन का निघालाय्?

त्याच गावातील श्रवणलालने जेव्हा भगतरामला छत्र्यांचे रहस्य विचारले, तेव्हा भगतरामने मोठ्या शांत व सहज भावनेने सांगितले, "यात काय आश्चर्याची गोष्ट आहे? आपण सगळेजण पाऊस पडण्यासाठी मंदिरात प्रार्थना करायला जात आहोत. आपल्या लोकांची प्रार्थना 'दीनानाथ हरी' अवश्य ऐकतील आणि आपण जेव्हा परत येऊ तेव्हा माझी छोटी छोटी मुले पावसात भिजतील, त्यांना सर्दी होईल, ती आजारी पडतील. त्यांच्यासाठीच मी छत्र्या घेऊन जात आहे."

तर असा होता भगतरामचा भगवंतावरचा विश्वास !

* * * * *

# परिणाम एका दुष्कर्माचा

एक भक्त आपला अनुभव कथन करताना सांगतात -

सकाळची वेळ होती. मी आपल्या वरच्या झोपण्याच्या जागेवरून खालच्या बसायच्या जागेवर येऊन बसलो. रेल्वेगाडी वेगात चालली होती. समोरच्या बाकावर दोन व्यक्ती बसल्या होत्या. त्यांच्या गळ्यात अस्थि भरलेल्या लाल पिशव्या लटकत होत्या. ते दोघेही उदास मनाने बसून बोलत होत. कधी कधी डोळे पुसत होते.

त्यातील एक वृद्ध ७०-७५ वर्षे वयाचा गावातील शेतकरी वाटत होता. तर दुसरा ३५ वर्षांचा कुणी त्याचाच परिचित होता. आता माझे सगळे लक्ष त्यांच्या बोलण्याकडे लागले. मी त्यांच्या खिन्न मनाने केल्या जाणाऱ्या गोष्टीमध्ये रुची घेऊ लागलो.

तो तरुण खूप दु:खी होता. वृद्ध शेतकरी त्याला समजावत होता. मी पण त्याचे सांत्वन केले आणि त्याला समजावले. मी समजावतोय् हे बघून तो वृद्ध मला म्हणाला, "बाबूजी, याचा छोटा भाऊ वारला, याला आणखी बरेच भाऊ आहेत. परंतु माझा २२ वर्षाचा विवाहित एकुलता एक मुलगा वारला, त्याला मूल वगैरे नव्हते, पण मी शोक करीत नाही. माझा तर शनीच गेला, दशा गेली. खूप वेळ झाला, मी याला सांगतोय् 'भोजन कर' तर हा ऐकत नाही. दुपार झाली, मला तर भूक लागली आहे. मी तर खाऊन घेतो, तू हवे तर खा किंवा नको खाऊस!"

म्हाताऱ्या शेतकऱ्याने भाकरीचे गाठोडे सोडले व मला म्हणाला "मेलेल्या माणसाच्या मागे आपण मरायचे नसते, हा आज नाही तर उद्या नाहीतर परवा जाणारच. जिवंत राहण्यासाठी पोटाच्या गिरणीत काही ना काही टाकायला तर हवेच ना!"

मी म्हणालो, "बाबा, तुम्ही तुमच्या मुलाला शनी का म्हणता?"

शेतकरी म्हणाला, "साला, तो तर माझे दिवाळे काढून गेला. मला त्याने जगणे मुष्किल केले. आता आणखी काही दिवस जगला असता तर माझी काय दुर्दशा झाली असती हे तर भगवंतच जाणे! बरं झालं तो गेला." असं म्हणून वृद्ध शेतकऱ्याने आपली करुण कहाणी सांगायला सुरुवात केली.

मी एक साधा गरीब शेतकरी, शेती करून जगत होतो. मी, माझी बायको आणि माझी मोठी विधवा बहीण असे आम्ही शेतातील छोट्याशा झोपडीत रहात होतो. बहीण माझ्याबरोबर शेतात काम करायची.

उन्हाळ्यातील एका संध्याकाळी अचानक आकाश अंधारले आणि पाऊस सुरू झाला. अंधार झाल्यावर झोपडीजवळ एक व्यापारी दुकानदार आला आणि म्हणाला, "माझ्याकडे काही धन आहे. पाऊस पडतोय्. आजच्या रात्रीपुरता झोपडीत आसरा द्या."

हा व्यापारी उधारी वसूल करून आलेला होता. अशा परिस्थितीत त्याला आम्ही आसरा दिला, भोजन दिले आणि झोपण्याची व्यवस्था केली. हे व्यापारी लोक गाववाल्यांवर विशेषत: शेतकऱ्यांवर विशेष विश्वास ठेवतात.

परंतु माझ्या बहिणीच्या मनात लोभ उत्पन्न झाला. 'लोभ हा पापाचा पिता आहे.' बहिण म्हणाली, "आपण रात्री हा झोपला की याला ठार मारू शेतात गाडून टाकू. कोण बघणार आहे? याच्या पैशाने आपली गरीबी निघून जाईल."

मी बहिणीला खूप समजावले, "अगं, याने आपल्यावर पूर्ण विश्वास ठेवला आहे. तो आसऱ्यासाठी आपल्याकडे आला आहे. असे केले तर तो विश्वासघात होईल. हे भीषण पाप आहे. त्यासाठी भगवंत आपल्याला कधीही क्षमा करणार नाहीत. आपल्याला नरकात घोर यातना भोगाव्या लागतील."



पण बहिणीच्या डोक्यात लोभाचे भूत शिरले होते. मी कितीही समजावले तरी तिच्यावर काही परिणाम झाला नाही. तिनेच मला विविध लोभ दाखवले. "दान देऊन पाप धुऊन टाकू आणि सुख भोगू" असे सांगितले.मला तिने ते दुष्कर्म करायला विवश केले. नंतर आम्ही दोघांनी (भाऊ-बहीण) मिळून त्या व्यापाऱ्याची रात्री हत्या केली आणि प्रेत शेतात गाडून टाकले. आजपर्यंत हे कुणालाही माहित नाही. त्याचे आठ हजार रुपये आम्ही घेतले.

त्या रुपयांनी आम्ही आणखी जागा खरेदी केली. शेतीवाडी वाढवली. कारभार वाढवला. मी 'मोठा शेतकरी' म्हणून गणला जाऊ लागलो. मी खूप कमावले. माझी बहीण मरण पावली. नंतर मला एक सुंदर तंदुरुस्त मुलगा झाला. त्याचे पालनपोषण मोठ्या लाडात, खर्चात झाले. एकुलता एक असल्याने त्याच्या आवडीनुसार पैसा खर्च करायचो. मुलगा वीस वर्षाचा झाला तेव्हा त्याचे लग्न एका चांगल्या घरातील सुंदर मुलीशी केले.

लग्नानंतर एक वर्षानी मुलगा आजारी पडला. उपचारात पाण्यासारखा पैसा घालवला. त्याचा जीव वाचवायला जीवापाड मेहनत केली. घर, शेती, जमीन सगळं विकलं. एकुलता एक विवाहित मुलगा मृत्यूच्या मुखात चालला होता. मोहामुळे दुःखाला सीमाच नव्हती. या सर्व दुःखात आणि चिंतेत त्याची आई मरून गेली.

मुलगा एक वर्षभर आजारी होता. गेल्या २०-२२ वर्षात जितके धन कमावले ते सगळे त्याच्या आजारपणात खर्च झाले. आर्थिक दशा अत्यंत खराब झाली. कर्ज काढायला लाज वाटत होती. सुनेला बघून रडू येत होते. बिचारी दिवसरात्र नवऱ्याच्या पलंगावर मौनपणे बसून रडत सेवा करत असे.

एक दिवस अशी स्थिती आली की माझ्याजवळ केवळ ५ रु. ची एक नोट राहिली आणि मुलगा शेवटचा श्वास घेत होता. मी त्याच्याजवळ बसलो तर तो अचानक म्हणाला, "बाबा, तुमच्या खिशात ५ रु. ची नोट आहे ना? मला सफरचंद खायची इच्छा होत आहे."

मी विचार केला, 'मुलाची शेवटची इच्छा पूर्ण करूया.' गावात मिळाले नाही म्हणून मी शहरात जाऊन सफरचंद आणले.

सफरचंद खाऊन मुलगा म्हणाला, "बाबा! तुम्ही मला ओळखता, मी कोण आहे ते ? मी तोच व्यापारी दुकानदार आहे, ज्याची पंचवीस वर्षापूर्वी शेतात आपल्या बहिणीबरोबर मिळून तुम्ही हत्या केली होती. माझे आठ हजार रुपये घेतले. तर आता मी माझे सगळे पैसे व्याजासकट वसूल करून जात आहे."

मी माझ्या सुनेकडे बोट दाखवून विचारले, "या बिचाऱ्या मुलीने तुझे काय बिघडवले आहे, जिला तू अनाथ दुःखी करून सोडून जात आहेस?"

मुलगा म्हणाला, "ही तुमची बहीण आहे. जिने तुम्हाला वाईट काम करायला लावले आणि त्या वाईट कामात तुमची मदत केली. म्हणून आता तुम्हीच सांभाळा तिला." असे बोलून त्याने प्राण सोडला.

मी पंचवीस वर्षापूर्वीची सगळी घटना आपल्या सुखात आणि मुलाच्या दुःखात विसरून गेलो होतो. आता माझे डोळे उघडले. आता सगळे आठवते आहे. पण पश्चाताप करून काय उपयोग? जे केले त्याचे भोग या जीवनात आणि नंतर परलोकात भोगावेच लागतील. मुलाच्या मरण्याचा मला अजिबात शोक नाही म्हणून मी त्याला शनी म्हटले!

* * * * *

# संगतीचा प्रभाव

"हे प्रवासी, कसला विचार करतो आहेस? माझा मालक येथे नाही म्हणून काही सामान चोरण्याचा का? बघ जर मी पिंजऱ्यात बांधलेलो नसतो तर मी तुला कच्चेच खाल्ले असते." अचानक एक पोपट बंद पिंजऱ्यातून पंखांची फडफड करत एका तहानलेल्या प्रवाशाला म्हणाला.

तहानलेला प्रवासी, जो पाण्यासाठी इकडे तिकडे पाणी शोधत होता, तो पोपटाचा आवाज आणि व्यवहार बघून घाबरला आणि कसाबसा आपल्या वाटेने धडपडत पुढे निघाला. भरभर चालल्याने त्याची तहान आणखी वाढली.

थोड्या वेळाने प्रवाशाने बघितले तर दूर एक झोपडी दिसत होती. झोपडी बघून त्याला पूर्ण विश्वास वाटला की आता मला तहानलेले रहावे लागणार नाही. परंतु हे काय? येथेही पिंजऱ्यात तोच पक्षी बसलाय्, जो विविध प्रकारे मला अपशब्द बोलतोय! प्रवासी घाबरला आणि विरुद्ध दिशेने धावू लागला.

अचानक एका स्वराने त्याला आपल्याकडे आकर्षित केले. प्रवाशाने ऐकले की कुणीतरी खूप गोड स्वरात बोलत आहे; "हे प्रवासी, मला वाटतं, तुम्ही खूप तहानलेले आहात. हे बघा, माझे मालक घरात असते तर त्यांनी तुमचा सत्कार अवश्य केला असता. मी तर पक्षी आहे. म्हणून तुम्हाला पाणी देऊ शकत नाही. परंतु, माझे



मालक दयाळू आहेत. त्यांनी जरूर झोपडीत पाणी ठेवले असेल. तुम्ही या, विश्राम करा, पाणी प्या."

इतके गोड स्वर ऐकून प्रवासी थांबला, पण जेव्हा त्याने बघितले की हा सन्मान करणारा पक्षी तर तसाच आहे. ज्याने मला अपशब्द सांगितले होते. प्रवाशाला वाटले, 'हा रूप घेणारा कुणी भूत आहे, याचे विचार वाईट आहेत.' प्रवासी पक्षाकडे पाठ करून विरुद्ध दिशेने धावू लागला. त्याच वेळी त्याने एक मधुर पण तीव्र आवाज ऐकला, पक्षी म्हणाला, "हे प्रवासी, तुम्ही का घाबरता? कदाचित तुम्ही आधी माझ्यासारखा पक्षी बघितला आहे."

आपल्या मनातील गोष्ट ऐकून प्रवासी थांबला व पक्ष्याचे बोलणे ऐकू लागला. पक्षी पुढे म्हणाला, "तो आणि मी, दोघे भाऊ आहोत. पण माझ्या भावाला एक कसाई घेऊन गेला होता. तो पूर्ण दिवस जिवांना मारतो, कापतो. म्हणून त्याचा स्वभाव कसाया–सारखा क्रूर झालाय्. पण मला एका साधुने उचलून आणले. मला साधू दोन वेळ भगवंताचा प्रसाद खाऊ घालतो. येथे अनेक साधू येतात. म्हणून माझा स्वभाव माझ्या भावाच्या विरुद्ध झाला. हे प्रवासी, घाबरू नका, या पाणी प्या, सावलीत विश्रांती घ्या."

पक्ष्यांचे बोलणे ऐकून प्रवासी झोपडीजवळ आला. पक्ष्याला पाहून त्याचे मस्तक श्रद्धेने वाकले. मनातल्या मनात प्रवासी म्हणाला, "हे पक्षी, तू धन्य आहेस. पक्षी असून तू साधुसंगत करतोस आणि भगवंतांचा प्रसाद खातोस."

यानंतर त्या प्रवाशाने झोपडीत प्रवेश केला. स्वतः माठातील पाणी प्यायला आणि थोडी विश्रांती घेऊन तो आपला मार्ग चालू लागला.

मनुष्याला ज्या प्रकारचे अन्न, पाणी व संग मिळतो त्याप्रकारे त्याचे विचार बनतात आणि विचारांच्या अनुसार माणूस चांगल्या किंवा वाईट विचारात लुप्त होतो. जर आपल्याला स्वत:ला व समाजाला सुधारायचे असेल तर आपल्याला आपला आहार सात्विक करायला हवा आणि सज्जन पुरुषांचा अधिकाधिक संग करायला हवा.

* * * * *

# मला समजायला थोडा वेळ लागला

जयपूर येथे श्री गोविंदजींच्या मंदिरात एक संतपुरुष प्रवचन करत होते. ते म्हणत होते, "हे बघा, भगवंतांना मानणे आपल्याला लाभदायक आहे. वास्तविकपणे तेच आपले नित्य माता, पिता, बंधू आहेत. त्यांच्या इच्छेशिवाय एक पानदेखील हलू शकत नाही. ते सगळ्या जिवांचे पालनपोषण करणारे आहेत, जर त्यांनी कुणाला भोजन दिले नाही, तर कितीही प्रयत्न केले तरी ती व्यक्ती भोजन घेऊ शकत नाही आणि जर ते भोजन देतील आणि जर कुणी खाल्ले नाही तर ते जबरदस्तीने खायला लावतील. अगदी मारपीट करून खायला घालतील."

भावविभोर होऊन जेव्हा संतपुरुष ही कथा सांगत होते तेव्हा श्रोत्यांमध्ये एक शेटजी होते, जे कधी कधी कथाकीर्तनात यायचे, ते विचार करू लागले; "काय ही गोष्ट खरी असू शकते की जर भगवंत जेवायला देतील तर खाऊ शकतो, नाही तर नाही आणि नंतर हे महात्मा सांगतात की जर भगवंताने कुणाला भोजन पाठवले आणि त्याने खाल्ले नाही तर ते त्याला मारून मारून खाऊ घालतात. हे कसे होऊ शकते? चला हे आपण ताडून बघू की ते खरे बोलत आहेत का? अरे, मी खाणारच नाही तर मला कोण खायला लावेल?"

रात्री झोपेपर्यंत शेटजी याच विचारात होते. मग त्यांनी निर्णय घेतला की उद्या पहाटेच मी परिवारापासून दूर वनात जाईन, घरात राहिलो तर बायको, मुले, मुली परत परत खायला सांगतील. घनदाट वनात एखाद्या उंच झाडावर चढून बसू. जेथे आपल्याला कुणी बघणार नाही. जर आपल्याला भूक लागली तरी झाडावरची पाने पण आपण खायची नाहीत असा त्यांनी निश्चय केला. बघतोच आता भगवंत मला कसे खायला लावतात ते? असा विचार करत शेटजी झोपी गेले.

पहाटेच शेटजीनी घरातल्यांना सांगितले की काही जरुरी कामासाठी मी बाहेर जात आहे, उशीर होऊ शकतो, जेवायला वाट पाहू नका.

शेटजी दूर वनात जाऊन उंच झाडावर चढून बसले जेथे त्यांना कुणी बघू शकत नव्हते. सकाळ संपली, दुपारी संपली, संध्याकाळ झाली, तरी शेटजींनी काही खाल्ले नाही. आपला संशय बरोबर होता या विचारात ते प्रसन्न होते.

तेवढ्यात त्यांनी बघितले की तीन-चार व्यक्ती हरणाच्या शिकारीला तेथे आल्या. त्यांनी आपले खाण्याचे सामान, काही कपडे त्याच झाडावर लटकवले. इतक्यात वाघाची मोठी डरकाळी जवळून ऐकू आल्यामुळे प्रचंड घाबरून ते शिकारी डबे वगैरे मागेच सोडून धूम पळत सुटले.

शेटजींना खूप भूक लागली होती पण काय करणार, ते खूप जिद्दी होते. उद्या



सकाळपर्यंत काही खायचे नाही. बघू या, भगवंत मला कसे खायला लावतात असे त्यांनी ठरवले.

जेव्हा रात्र झाली तेव्हा शेटजीने बघितले की एक डाकूंची टोळी शेजारील गावात दरोडा टाकून त्याच झाडाखाली मशाली घेऊन आली. चोरलेला माल बघताना अचानक त्यांना वरचा जेवणाचा डबा दिसला. एक डाकू म्हणाला, "अरे, कुणाचा तरी डबा इथे राहिला आहे. बघूया तरी काय आहे यात?" डबा उघडल्यावर त्यांना ३-४ जणांचे जेवण त्यात दिसले. त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, "अरे वा! बरं झालं खूप भूक लागली आहे, चला आधी खाऊ या मग वाटण्या करू."

त्यावेळी एक डाकू म्हणाला, "ऐका! असं तर नसेल ना की, एखाद्याला आपल्या या ठिकाणाची माहिती असेल आणि त्याने विष घालून हे जेवण आपल्याला ठार करायला ठेवले असेल. आपण हा विषारी डबा खाऊ व आपली सगळी संपत्ती घेऊन टाकण्याचा त्याचा विचार असेल."

उरलेले म्हणाले, "हा असेच असेल." दुसरा म्हणाला, "जर असे असेल तर तो इथेच लपलेला असेल, चला शोधू या त्याला, ज्याला आपला अड्डा समजलाय्."

एवढे बोलून दोन डाकू संपत्तीचे रक्षण करत बसले व इतर माणसाला शोधू लागले. खूप वेळाने एका डाकूला एका झाडावर शेटजीचे कपडे दिसले. त्याने इतर साथीदारांना बोलावले. सगळ्यांनी बघितले की इतक्या रात्री एका झाडावर एक माणूस बसून राहिलेला दिसला.

मग काय, दोन डाकू वर चढले व त्यांनी शिव्या देत, मारत त्याला खाली उतरवले आणि शेटजींना मारत मारत विचारले, "आम्हाला मारण्यासाठी हे अन्न ठेवलेस काय, बोल कुणी सांगितले तुला आमचे ठिकाण?"

शेटजी त्यांच्या हातापाया पडू लागले. शेटजीच्या अंगावर जागोजागी जखमा झाल्या. पण त्यांचे बोलणे ऐकायला कुणीच तयार नव्हते. तेव्हा डाकू म्हणाले, "यालाच हे अन्न खाऊ घाला, जर हा मेला तर अन्न फेकून देऊ या आणि जरा हा मेला नाही तर आपण समजूया की यात विष नाही, आपण ते खाऊ शकतो, तेव्हा आपण हे अन्न वाटून खाऊ."

शेटजी म्हणाले, "भगवंताची शपथ, पण या जेवणात विष नाही, तुम्ही आरामात खाऊ शकता." बस एवढे बोलायची खोटी, सगळे डाकू त्याच्यावर तुटून पडले, "अरे घुबडा, जेवणात काही नाही म्हणतोस, मग खात का नाहीस? खा! नाहीतर मारून मारून तुझी हालत खराब करून टाकू."

शेटजी म्हणाले, "कृपा करून माझ्यावर विश्वास ठेवा, मी पवित्र कुळातील आहे, मी इकडे, तिकडे कुणाच्याही हातचे अन्न खात नाही."

डाकू म्हणाले, "ए गाढवा, नखरे करतोस काय? (शेटजीला ५-६ लाथा मारून) खा हे, नाहीतर मारून मारून ठार करू."

आता काय करणार? डाकू सगळ्या डब्यातील एक एक घास देत होता, ते शेटजी गूपचूप खात होते. जेव्हा डाकूंनी बघितले की याला काहीही होत नाही आहे; तेव्हा त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून विचारले, "काय झाले होते?"

संतपुरुषांच्या प्रवचनांपासून आतापर्यंतची सर्व कहाणी शेटजींनी कण्हत कण्हत सांगितली, विनवण्या करून त्यांची परवानगी घेतली आणि शेटजी कसेबसे आपल्या घरी पोहोचले.

शेटजींची अशी परिस्थिती बघून घरचे लोक घाबरले. त्यांना मलमपट्टी वगैरे करताना त्यांची चौकशी करू लागले, "काय झाले तुम्हाला? सकाळपासून कुठे गेला होतात? कुणाशी भांडण झाले?"

लाजेने चूर झालेले शेटजी म्हणाले, "भगवंतांच्या इच्छेशिवाय एकही पान हलत नाही. ते सर्व जिवांचे पालन पोषण करतात. जर त्यांनी भोजन दिले नाही तर कितीही प्रयत्न करा. एखाद्याला भोजन मिळणारच नाही आणि जर भगवंतांनी भोजन दिले आणि जर कुणी हट्टाने ते खाल्ले नाही तर भगवंत त्या व्यक्तीला जबरदस्तीने मारुन मुटकून खायला घालतात." मंदिरातले महाराज बरोबरच सांगत होते. पण मला समजायला थोडा उशीर झाला."

* * * * *

# आकाशाच्या दिशेने थुंकणे



कृष्णकृपामूर्ती श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकूर एक कथा सांगतात. ती अशी – पौर्णिमेच्या रात्री पूर्ण विकसित चंद्र व ताऱ्यांना बघून एक मुलगा त्यांना तोडून द्या म्हणून आपल्या आईवडिलांकडे हट्ट करू लागला. मुलाच्या आईवडिलांनी मुलाला खूप समजावले की 'आपण सामान्य माणसे, या चंद्र-ताऱ्यांना स्पर्शपण करू शकत नाही.' पण मुलगा काही ऐकेना त्याने मोठ्याने रडायला सुरुवात केली.

वडिलांनी मुलाचे मन गुंतवण्यासाठी एक युक्ती केली आणि मुलाला त्यांनी एका उंच घरावर उभे केले आणि सांगितले, "बेटा, तुला पाहिजे तितके तारे तोड." त्यावेळी अजाण बालक छपरावर चढून उड्या मारून मारून तारे पकडण्याचा प्रयत्न करू लागला.

पण हे तारे कसे त्याच्या हाताला लागतील? "मी इतका वर चढलो तरी ते मला चमचम करून चिडवत आहेत, हे सैतान तारे माझ्या हातात येत नाहीत." असा विचार करून तो मुलगा आकाशावर रागावला. तो आकाशाला शिव्या देऊ लागला, "दुष्ट आकाशा! तू चंद्र, ताऱ्यांना इतके वर का उचलून ठेवले आहेस? थांब आता तुला धडा शिकवतो." असे म्हणून त्या अज्ञानी बालकाने आकाशाच्या दिशेने थुंकायला सुरूवात केली. परंतु सर्व थुंकी त्याच्या स्वतःच्या तोंडावर पडली.

ज्याप्रकारे मुलाने आकाशावर थुंकल्याने ती थुंकी त्याच्याच अंगावर पडली; आकाशाचे काही बिघडले नाही. त्याचप्रमाणे उत्तम भक्त आणि सद्गुरूंना कष्ट दिल्याने आणि त्यांची निंदा केल्याने, निंदा करणारी व्यक्तीच वैष्णव अपराधी होऊन भयंकर अशा त्रितापाच्या ज्वाळांमध्ये कष्ट भोगते. गुरूवैष्णवांवर त्याचा काही प्रभाव पडत नाही.

यासाठी जन हो, सावधान! वैष्णव अपराध खूपच भयंकर असतो. तो भयंकर, मनमानी करणारा हत्ती आहे; जो भक्तीरूपी लतेला अगदी सहजतेने मुळापासून उचकटून फेकून देतो. एकदा का हा हत्ती मदमस्त झाली की मग त्याला शांत करणे कठीण होते. म्हणून यापासून नेहमीच वाचण्याचा प्रयत्न करायला पाहिजे.

* * * * *

# एक जुनी आठवण

साधूमहाराजांचे प्रवचन ऐकून मुकुंद आपला मित्र अमरबरोबर घरी परतत होता. साधूंनी सांगितलेली वाक्ये त्याच्या डोक्यात घोळत होती.

मुकुंदच्या मनात विचार येऊ लागले, “आहा! किती छान वाटू लागलं आता हे जीवन! खरं तर ‘खरं’ जीवन आता सुरू झाले. आधी जगत होतो ते काय जीवन होतं...? त्या जीवनात जीवन नावालाही नव्हतं. बस् केवळ देखावा होता देखावा! गडबडच गडबड होती आणि ती पण फुकटची. दिवसरात्र मी मायेच्या चक्रात भटकत होतो.”

“किती खोटे बोलायचो, दारू प्यायचो मी. अंडे खाणे पाप आहे, याचा कधी विचारच केला नव्हता. त्याला मी पांढरा बटाटा म्हणायचो. जीवनात सत्संग नव्हता की कीर्तन नव्हते आणि साधू, महापुरुषांजवळ बसणेही नव्हते. या सगळ्या गोष्टींना मी फालतू समजत होतो. पण आताची गोष्टच वेगळी आहे...” अशा प्रकारे विचार करत करत मुकुंद विचारात हरवला. आपण अमरबरोबर चालत आहोत हे ही तो विसरला.

“काय झाले? कुठे हरवलास?” अमरने विचारले. मुकुंद म्हणाला, “काही नाही बस् आपल्या पूर्व आठवणींमध्ये हरवलो होतो. मित्रा अमर, एक गोष्ट आहे, मी आताच्या आणि आधीच्या जीवनाबद्दल विचार करत होतो. तेव्हा तर जे वाईट, ते चांगले वाटायचे आणि जे खरेच चांगले आहे ते वेळ फुकट घालवणे वाटायचे असे का होते मित्रा?”

अमर म्हणाला, “अरे मुकुंद, ही काय विचारायची गोष्ट आहे? आपण जालंधरला गेलो होतो त्यावेळी आपण ज्योती चौकात काय पाहिले आठवते ना?”

मुकुंद म्हणाला, “काय बघितले? मला काही आठवत नाही.”

“अरे तुला आठवत नाही का तो पिवळा शर्ट घातलेला माणूस? तो खूप दारू पिलेला होता आणि मग तो घाणेरड्या गटारात जाऊन पडला, डुकरांमध्ये!”

मुकुंद म्हणाला, “अरे माफ कर, मला तर नाही आठवत!”

अमर म्हणाला, “कमाल आहे तुझी तर. अरे तो माणूस त्या चिखलात पडला होता. त्यावेळी अचानक त्याच्या हातात एका डुकराची शेपूट आली. दारूच्या नशेत चूर असलेला तो माणूस म्हणू लागला, काय ग लल्लूची आई, काल तर तू अंबाडा घातला होतास, आज वेणी का घातलीस?”

मुकुंद हसत म्हणाला, “हो, हो, आता आठवलं!”

अमर म्हणाला, “तर मित्रा, असं आहे नशेचं! नशेत माणसाला घाणेरडे गटार



आपले घर वाटते आणि डुकराची शेपटी ही आपल्या बायकोची वेणी वाटते. अशाच प्रकारे मायेच्या नशेत मनुष्य या जगाला आपले घर आणि हे अनित्य शरीर व शरीरसंबंधी व्यक्ती, वस्तू यांना आपले सर्वस्व समजतात. जेव्हा ती नशा उतरते तेव्हा तो बघतो, 'अरे, मी तर भगवंताचा दास आहे. मायेचा दास नाही, ज्यांना मी आपला समजत होतो ते सगळे स्वार्थी आहेत. स्मशानापर्यंतचे सोबती आहेत.' मुकुंद, तुझी नशा उतरली आहे म्हणून तू खऱ्याला खरे व खोट्याला खोटे म्हणून बघू शकतोस, ओळखू शकतोस."

मुकुंद म्हणाला, "ही सगळी वैष्णवकृपा आहे!"

* * * * *

# Yes, No, Very Good

श्रील भक्तिसिद्धांत सरस्वती ठाकूर सांगतात –

एका गावात एका माणसाने लोकांचे ऐकून ऐकून थोडे थोडे इंग्रजीचे शब्द शिकून घेतले. त्यातील Yes, No, Very Good हे शब्द त्याने विशेष करून लक्षात ठेवले. पण कोणत्या वेळी, कोणत्या कारणासाठी हे शब्द वापरावेत यावर त्याने बिलकुल लक्ष दिले नाही. त्याला केवळ इतकेच माहित होते, जर लोकांशी इंग्रजीत बोललो तर आपल्याला सन्मान मिळेल.

एकदा काही दुष्ट लोकांनी एक भयंकर हत्याकांड केले व स्वतःला वाचवण्यासाठी त्यांनी गावातील या भोळ्या माणसाला पकडवून दिले. जेव्हा त्या माणसाला न्यायालयात आणले गेले, तेव्हा न्यायाधीशाने त्याला विचारले, "काय रे, तू हत्या केलीस काय?"

त्यावेळी त्या गावरान माणसाने विचार केला जर मी या न्यायाधीशाशी २–४ इंग्रजी शब्द बोललो तर तो मला इंग्रज लोकांचा गुप्तचर म्हणून जाणेल व माझा मोठा सन्मान करेल व या खोट्या दोषापासून माझी मुक्तता करेल. म्हणून त्याने उत्तर दिले, "Yes"




न्यायाधीशाने विचारले, "काय तुझ्याबरोबर आणखी कुणी होते?"

गावरान माणूस चटकन् म्हणाला "No" तेव्हा न्यायाधीश म्हणाले, "तर मग तुला जेलमध्ये जावे लागेल. काय जेलमध्ये जायला तू तयार आहेस का?"

यावेळी या गावरान माणसाने विचार केला, 'यावेळी मी माझ्या शेवटच्या अस्त्राचा प्रयोग करून या अन्यायाला प्रतिकार करेन. ज्यामुळे त्यांना समजेल की मी कुणाचीही हत्त्या केलेली नाही आणि म्हणून मी जेलमध्येही जाणार नाही, मी तर चांगला माणूस आहे.' आणि म्हणून त्या माणसाने न्यायाधीशाच्या शेवटच्या प्रश्नाला उत्तर दिले, "Very Good"


भक्तीत काहीजण शुद्ध भक्तांचा उपदेश, परिभाषा व सिद्धांतांच्या खऱ्या मर्माला न जाणता केवळ पोपटासारखी पोपटपंची करतात. ते लोक याच उपायाने लोकांकडून सन्मानाची इच्छा करतात. पण अशा लोकांची दशा या गावरान माणसाप्रमाणे होते.

साधू आणि शास्त्राची वाक्ये या लोकांना पचत नाहीत. त्यामुळे खरे साधू लोकही त्यांचा आदर करत नाहीत; आणि त्यामुळे मायेकडून दंड भोगण्यापासून त्यांची सुटका होत नाही.

खूप मोठे मोठे तथाकथित पंडित आणि आधुनिक शिकलेल्या व्यक्ती, 'भक्ती, भगवान आणि भक्त' यांच्या संबंधात सभांमध्ये आणि साहित्यांमध्ये खिल्ली उडवताना बघितले जाते. हे बघून व ऐकून भक्ती सिद्धांताचे परीक्षक आणि विचारक या सर्व व्यक्तींना त्या गावरान व्यक्तीप्रमाणे मानतात, जो Yes, No, Very Good म्हणणारा असतो. अशा प्रकारे पांडित्य प्रदर्शन करणाऱ्या या सर्व व्यक्तींना मायेच्या जेलमध्ये दंड भोगावा लागतो.

* * * * *

# सहनशीलता



एक संतपुरुष होडीत बसून नदी पार करत होते. संध्याकाळची वेळ होती. होडीची शेवटची फेरी होती म्हणून त्यात खूप गर्दी होती. संत आपल्यातच मग्न होऊन एका बाजूला बसले होते.

२-३ बदमाशांनी या संताची चेष्टा करायला सुरुवात केली. संत आपल्या ध्यानात मग्न होते. त्यांनी इकडे तिकडे लक्ष दिले नाही. आता त्या माणसांनी संताचे लक्ष आपल्याकडे खेचून घेण्यासाठी ते संताजवळ जाऊन गोंगाट करू लागले. नंतर त्यांनी शिव्या द्यायला सुरुवात केली.

त्या संतपुरुषांनी मात्र आपली दृष्टी नासिकेवर केंद्रित केली होती. हे बघून टिंगलखोरांनी त्यांना धक्के मारायला सुरुवात केली.

जवळच काही सभ्य माणसे बसली होती. हे संताला म्हणाले, "महाराज! एवढी सहनशीलता चांगली नाही. तुमच्या शरीरात खूप ताकत आहे. तुम्ही जर या बदमाश लोकांना थोडे जरी ओरडलात तर ते आता सरळ होतील."

संत, सज्जन लोकांना म्हणाले, "बंधूनो, सहनशीलता कुठे आहे? मी तर असहिष्णू आहे. सहन करायची शक्ती तर अजून माझ्यात आलीच नाही. मी या गोष्टीला प्रतिकार आपल्या प्रकारे करत होतो. मी भगवंतांना प्रार्थना करत होतो, की कृपा करून या लोकांची बुद्धी सुधारा म्हणजे यांचे हृदय निर्मळ होईल."

संत आणि सज्जन लोकांचे हे बोलणे ऐकून हे बदमाश खूप चिडले. संताला उचलून नदीत फेकण्यास ते तयार झाले. इतक्यात आकाशवाणी झाली, "हे संतशिरोमणी, हे बदमाश लोक तुला या नदीतील खोल पाण्यात बुडवायला जात आहेत परंतु तू सांगत असशील तर त्यांना भस्म करून टाकले जाईल."

आकाशवाणी ऐकून ते बदमाश प्रचंड घाबरले आणि संत रडू लागले. संतांना रडताना बघून या बदमाशांना वाटले की हा आता 'आपल्याला भस्म करा' असे सांगेल. ते भीतीने थरथर कापू लागले.

त्याच वेळी संत म्हणाले, "असं करू नका भगवंता! माझ्यासारख्या तुच्छ जीवासाठी इतक्या लोकांचे प्राण घेऊ नका. हे भगवान, त्यांचा विनाश करावा अशी

माझी इच्छा नाही. पण त्यांना सुधारण्याची खूप इच्छा आहे. आपण त्यांना भस्म न करता त्यांच्या मनातील कुविचारांना आणि वाईट प्रवृतींना, त्यांच्यातील दोषांना, दुर्गुणांना, त्यांच्या पापांना व तापांना भस्म करा. ज्याने त्यांचे हृदय निर्मळ होईल."

आकाशवाणी म्हणाली, "संतशिरोमणी असेच होईल. तुझी भावना खूप उच्च आहे. तू मला प्रिय आहेस. तू धन्य आहेस."

बस्! लगेच ते बदमाश मोठे साधू प्रवृत्तीचे झाले आणि संतांच्या चरणाशी त्यांनी लोळण घेतली.

* * * * *

# सर्वात मोठा सन्मान



एकदा अकबराने बिरबलला विचारले, "बिरबल, सर्वात मोठा सन्मान कोणता?" बिरबल म्हणाला, "जहाँपनाह, मधुर बोलणे हाच सर्वात मोठा सन्मान आहे."

अकबर म्हणाला, "बिरबल, मी कसं काय मानू की मधुर बोलणे हाच सर्वात मोठा सन्मान आहे?"

बिरबल म्हणाला, "जहाँपनाह, वेळ आल्यावर मी सांगेन."

एक दिवस बिरबलाने मेजवानीचा बेत केला, त्यासाठी त्याने आपले नातेवाईक, मित्र आणि अकबराच्या बहिणीला आमंत्रण दिले.

मेजवानीच्या दिवशी अकबराच्या बहिणीला हत्ती, घोडे, पालखी, वाजंत्री अशा प्रकारे विशेष सन्मानात आणले गेले. रस्त्यात मोहरा उधळल्या गेल्या.

मेजवानीला अकबराच्या बहिणीला स्वतः बिरबलाने भोजन वाढले, हे बघून अकबराची बहीण खूप खूष झाली. ती आनंदाने जेवू लागली. बिरबल तिला परत परत आग्रह करून वाढत होता.

तिने पुन्हा पुन्हा नको सांगितले तरी बिरबलाने तिच्या ताटात खाणे वाढले आणि म्हणाला, "खाऊन घे, खाऊन घे. तुझ्या बापाचे काय जाते?"

हे ऐकल्यावर अकबराच्या बहिणीने अत्यंत रागाने जेवणाचे ताट फेकले आणि लगेच ती अकबराला भेटायला गेली आणि अकबराला म्हणाली, "बिरबलला फासावर लटकवा."

दुसऱ्या दिवशी अकबराने बिरबलला विचारले, "बिरबल, तू माझ्या बहिणीचा काय अपराध केलास की तिने तुला फाशी द्या असे सांगितले."

बिरबलाने सर्व वृत्तांत सांगितला, कशा प्रकारे त्याने अकबराच्या बहिणीला घरी सन्मानाने आणले, स्वतःच्या हाताने भोजन वाढले.

अकबराने बहिणीला विचारले तर तिने बिरबलाने बोललेले अपमानजनक शब्द सांगितले. तेव्हा अकबराने बिरबलला याचे कारण विचारले.

बिरबलाने उत्तर दिले, "जहाँपनाह, हे तर आपल्या त्या प्रश्नाचे उत्तर आहे. अर्थात मधुर बोलणे हा सर्वात मोठा सन्मान आहे."

* * * * *

# मनापासून लिहिलेले पत्र

एका राजाला खूप राण्या होत्या. राजा काही कारणासाठी विदेशी गेला आणि तेथे बराच काळ राहिला. राण्यांनी ऐकले की राजा आता ज्या देशात आहे तेथे अमुक अमुक वस्तू खूप छान मिळतात.

हे ऐकल्यावर एका राणीने राजाला लिहिले की, "तेथील कंठहार चांगले असतात, ते जरूर आणा!"

दुसरीने लिहिले, "तेथील फुलझाडे छान असतात ती अवश्य आणा."

अशा प्रकारे सर्व राण्यांनी विविध वस्तू आणा म्हणून लिहिले. पण एका राणीने लिहिले, "मला कोणत्याच वस्तूची आवश्यकता नाही. बराच काळ झाला. आपले दर्शन झाले नाही. या दासीला आपणच येऊन कृतार्थ करा."

राजाने सर्व राण्यांची पत्रे वाचली. राण्यांच्या मागणीनुसार राजाने सर्व वस्तू मागवल्या आणि स्वतःच्या इच्छेनुसार पाहिजे त्या वस्तू मागवल्या.

राजा घरी आल्यावर राजाने सर्व राण्यांचे प्रार्थनापत्र उघडले आणि जिने जी वस्तू मागितली होती ती ती वस्तू त्यांना दिली.



मग राजाने ज्या स्वखुशीने वस्तू आणल्या होत्या त्या घेतल्या व तो त्या राणीच्या महालात गेला, जिने प्रार्थनापत्रात लिहिले होते की 'मी केवळ तुमची इच्छा करते.'